दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २०७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.२८ ऑक्टोबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com


## उरण-खारकोपर रेल्वे प्रकल्पाच्या कामाला वेग

# जानेवारी २०२३ ला उरण प्रवासी रेल्वे धावणार

**दै.रायगड नगरी । उरण**

**उरणकरांची खारकोपर ते उरण रेल्वेची प्रतिक्षा लवकरच संपणार असून २०२३ मध्ये उरण पर्यंत रेल्वे धावणार असल्याचे म्हटले जात आहे. त्या अनुषंगाने रेल्वेच्या वतीने या १४ किलोमीटरच्या मार्गावर अखंड २६० मीटर लांबीचे रेल्वे ट्रॅक टाकण्याच्या कामाला उरण स्थानकातून सुरूवात करण्यात आली आहे.**

### प्रवाशांची प्रतिक्षा संपणार



गेले काही वर्ष नवी मुंबई येथील नेरुळ ते उरण दरम्याच्या रेल्वे ट्रॅकचे काम सूरु असून त्याचे काम उलवे नोड मधील खारकोपर पर्यंत पूर्ण झाले आहे.तसेच या ठिकाणापर्यंत रेल्वेसेवाही सुरळीत सुरु आहे. परंतू या मार्गावरील शेवटचा टप्पा असलेल्या खारकोपर ते उरण या टप्प्याचे काम रखडल्याने उरणकर मात्र अजून रेल्वेच्या प्रतिक्षेतच आहेत.

परंतू कोरोना नंतर या मार्गाचे रखडलेले काम पुन्हा सुरु झाले आसून डिसेंबर २०२२ पर्यंत पूर्ण करून जानेवारी २०२३ पासून उरण पर्यंत रेल्वे धावली पाहीजे असे आदेश केंद्रातून आले आहेत.

त्यामुळे गेले काही दिवस या मार्गावरील कामाने वेग घेतल्याचे दिसत आहे. त्याचे उदाहरण म्हणजे आपल्या मागण्यांसाठी जासई येथे बंद करण्यात आलेले रेल्वे पुलाचे काम पोलिस बंदोबस्तात सुरू केले आहे. त्यामुळे या आगोदर अनेकवेळा उरणच्या रेल्वे प्रकल्प सुरु होण्याच्या डेडलाईन हुकल्या असल्या तरीही आत्ता अखेरच्या टप्प्यांची कामे प्रगती पथावर असल्याने येथील प्रवाशांची प्रतिक्षा संपणार असल्याचे संकेत खात्रीशीर सूत्रांकडून मिळत आहेत.

# गोदामाला भीषण आग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली येथे असलेल्या फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या तांदळाच्या गोदामाला भीषण आग लागून त्यात मोठे नुकसान झाल्याची घटना घडली आहे.

कळंबोली येथील फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या तांदळाच्या गोदामाला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. आग लागली तेव्हा गोदाम बंद होते, मात्र आगीत मोठ्या प्रमाणात अन्नधान्याचा साठा असलेले अन्नधान्य पूर्णपणे जळून खाक झाले. प्रथमदर्शनी, शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याची माहिती कळंबोलीच्या अग्निशमन अधिकाऱ्याने दिली. अग्निशमन दलाला आग विझवण्यासाठी गोदामाचे शटर फोडावे लागले आणि १५ मिनिटांत आग आटोक्यात आणली.

याबाबत अग्निशमन अधिकारी सौरभ पाटील यांनी सांगितले की, आम्हाला बुधवारी सकाळी ७.०४ च्या सुमारास आग लागल्याचा फोन आला. अग्निशमन दलाच्या ५ गाड्या घटनास्थळी हजर झाल्या व त्यांनी शर्तीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. या आगीत जीवितहानी झाली नसली तरी मालाचे मोठे नुकसान झाले आहे.



# अनिल देशमुख पुन्हा हायकोर्टात

## ११ नोव्हेंबरला सुनावणीची शक्यता

**दै.रायगड नगरी । मुंबई**

ईडीने दाखल केलेल्या मनी लॉन्ड्रिंगच्या गुन्ह्याच्या प्रकरणात ४ ऑक्टोबरला मुंबई हायकोर्टाकडून जामीन मंजूर होऊनही सीबीआयने दाखल केलेल्या गुन्ह्याच्या प्रकरणात विशेष सीबीआय कोर्टाने २१ ऑक्टोबरला जामीन नाकारल्याने दिवाळीतही न्यायालयीन कोठडीतच असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी आता पुन्हा मुंबई हायकोर्टात धाव घेतली आहे. सीबीआय प्रकरणातही जामीन मिळण्यासाठी त्यांनी हायकोर्टात जामीन अर्ज केला आहे. त्यावर ११ नोव्हेंबरला सुनावणी होण्याची शक्यता आहे.

'याच आरोपांबाबत ईडीने पीएमएलए कायद्यांतर्गत दाखल केलेल्या गुन्ह्याच्या प्रकरणात मुंबई हायकोर्टाने जामीन मंजूर केलेला असताना आणि सीबीआयचे अपिल फेटाळून तो सुप्रीम कोर्टानेही कायम ठेवला असताना मुंबईतील विशेष सीबीआय कोर्टाने दोन्ही वरिष्ठ कोर्टांच्या आदेशांच्या वरचढ होण्याचा प्रयत्न केला आहे. अशा प्रकाराला उत्तेजन दिले जाऊ शकत नाही. हायकोर्टाने माझ्यावरील तशाच प्रकारच्या आरोपांबाबत सर्व बाबींचा उहापोह करूनच जामीन मंजूर केला. तरीही जामीन नाकारणारा सीबीआय कोर्टाचा आदेश हा विचित्र व कायद्याच्या निश्चित तत्त्वांशी विसंगत आहे. पीएमएलए कायद्यात आरोपीला




.../२

# विवाहितेचा संशयास्पद मृत्यू ; नवऱ्यासह पाच जणांना अटक

**दै.रायगड नगरी । कर्जत**

**कर्जत तालुक्यातील उकरूळ येथील विवाहित महिलेचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. त्या महिलेला आत्महत्या करण्यास परावृत्त केल्याप्रकरणी नेरळ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल असून, पोलिसांनी नवऱ्यासह पाच जणांना अटक केली आहे.**

नेरळ येथील हार विक्रेते संतोष दळवी यांची २१ वर्षीय कन्या करीना हीचा मार्च २०२१ मध्ये तालुक्यातील उकरुल येथील सचिन मोहिते यांच्याशी विवाह झाला होता. करीना ही भजनी गायिका म्हणून रायगड आणि ठाणे जिल्ह्यात प्रसिद्ध होती आणि तिचे भजनाचे कार्यक्रम तसेच भजनाची जुगलबंदी असे कार्यक्रम सर्वत्र होत असत. सचिन मोहिते हा तरुण रसायनी आद्योगिक वसाहतीत नोकरीला असून घरात राहत असताना मोहिते यांच्या घरातील सर्वच मंडळी यांच्याकडून त्रास होत होता, मात्र त्याबद्दल तिने कोणालाही कोणतीही तक्रार केली नव्हती. मात्र मोहिते कुटुंब सतत स्नेहा तथा करीना हीचा मानसिक छळ आणि शारीरिक छळ नवरा सचिन तसेच सासू, सासरे आणि दोन्ही नणंद यांच्या कडून सुरू होता.



स्नेहा ही जेव्हा पाच महिन्यांची गरोदर होती, तेव्हा देखील सचिन मोहिते हे तिला तुझे कोणाशी तरी प्रेमसंबंध आहेत असे बोलून तिचे चारित्र्यावर संशय घेवून तिला मानसिक त्रास दिला होता. उकरुळ येथील त्यांचे घरात काहीही घटना घडली तरी तिलाच जबाबदार धरून शिवीगाळ करून मानसिक त्रास देत होते.

शनिवार (दि.८) करीनाने आत्महत्या केली होती. मात्र त्यावेळी जिवंत असलेल्या करीना यांच्यावर बदलापूर येथील खासगी रुग्णालयात उपचार घेत असताना मृत्यू झाला असता, पोलीस केस झाल्याने मृतदेह मुंबई येथील जे. जे. हॉस्पिटल येथे नेवून शवच्छिेदन करण्यात आले. मात्र सासरच्या लोकांच्या त्रासाला कंटाळून करीना तथा स्नेहा सचिन मोहिते हिने आत्महत्या केली असल्याची फिर्याद नोंदवल्या नंतर नेरळ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झाला. विवाहितेला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी नेरळ पोलिसांनी नवरा, सासू, सासरे तसेच दोन्ही नणंद यांना अटक केली आहे.

# पनवेल अर्बन बँकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पुढील महिन्यात पनवेल अर्बन बँकेची निवडणूक असून या निवडणुकीकरिता भरतीत जनता पार्टीच्या उमेदवारांनी भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आज (दि. २७) आपले उमदेवारी अर्ज दाखल केले.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी उमेदवारांनी पनवेल तालुका व शहर भाजपच्या कार्यालयात महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन केले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सचिन पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, कामोठे अध्यक्ष रविंद्र जोशी, शहर सरचिटणीस माजी नगरसेवक नितीन पाटील, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेवक अनिल भगत, हरेश केणी, मनोहर म्हात्रे, बबन मुकादम, अमर पाटील, विकास घरत, विजय चिपळेकर, प्रदीप भगत, मुकीत काझी, माजी नगरसेविका नीता माळी, माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, युवा नेते विनोद साबळे, ज्येष्ठ कार्यकर्ते कर्णा शेलार, प्रभाकर जोशी, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, सरचिटणीस दशरथ म्हात्रे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, तालुका अध्यक्ष आनंद ढवळे, नंदकुमार म्हात्रे, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



एकूण १३ जागांसाठी हि निवडणूक होणार असून सर्वसाधारण ०८, महिला प्रतिनिधी ०२, अनुसूचित जाती, जमाती ०१, इतर मागास ०१, भटक्या विमुक्त जमाती, मागास प्रवर्ग ०१ अशा जागांचा समावेश आहे. नामनिर्देशन दाखल करण्याची शेवटची तारिख आज (दि. २७ ऑक्टोबर) होती. नामनिर्देशन पत्राची छाननी २८ ऑक्टोबरला, तर ३१ ऑक्टोबरला वैध नामनिर्देशित पत्राची सुची घोषित होणार आहे. त्यानंतर १५ नोव्हेंबरला निशाणीचे वाटप, २७ नोव्हेंबरला मतदान तर २८ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

या निवडणुकीतील सर्वसाधारण जागेसाठी अजय यशवंत कांडपिळे, बळीराम नारायण म्हात्रे, यतीन शशिकांत देशमुख, श्रीनंद मुकुंद पटवर्धन, भगवान तुकाराम मुकादम, असिफ हसन करेल, कृष्णा सिताराम पाटील, भगवान शंकर पाटील, महिला प्रतिनिधी म्हणून प्रमिला जयराम मुंबईकर, निकिता निवृत्ती नावडेकर, अनुसूचित जाती जमाती जागेसाठी महेंद्र जानू गायकवाड, इतर मागासवर्गीय जागेसाठी प्रल्हाद गोविंद केणी, भटक्या विमुक्त जमाती जागेकरिता सुहासिनी दिनेश केकाणे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

> पनवेल अर्बन बँकेचा उत्कर्ष झाला पाहिजे, यासाठी निवडणुकीत भाग घेत आहोत. सर्वांनी मेहनत घेऊन हि निवडणूक जिंकू या. आपले सर्व उमेदवार आणि त्यांचे सहकारी यांना विजयासाठी शुभेच्छा.
>
> **– आमदार प्रशांत ठाकूर**

# पनवेलमधून ८ लाखाच्या दागिन्यांची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घराबाहेर जाताना आपण दरवाजा नीट लॉक केला आहे का ? खिडकी अथवा घराचा आणखी कोणता भाग चोरट्यांना शिरकाव करण्यास उघडा तर नाही ना या बाबींची काळजी घेणे अत्यंत गरजेचे झालंय. एक लापरवाही आणि चोरट्यांच्या हाती आयते कोलीत सापडल्याची घटना पनवेल शहरात घडलीय.

पनवेल शहर पोलीस स्टेशनच्या शेजारीच असलेल्या विघ्नहर्ता सोसायटीमध्ये चोरट्यांनी आयत्या मिळलेल्या संधीचे सोने केलं आणि घरातील सोने,नाणे, दागदागिने, रोकड असा तब्बल ८ लाख रुपयांच्या ऐवजावर डल्ला मारला. शहर पोलीस स्टेशनच्या बाजूलाच असलेल्या इमारतीमध्ये असा धाडसी दरोडा पडल्याने परिसरात घबराटीचे वातावरण तयार झालंय. विघ्नहर्ता सोसायटीतील जयेंद्र पाटील यांनी घराबाहेर जाताना दरवाजाला कडी– कुलूप न लावता दरवाजा फक्त ओढून बंद केला. मात्र घरात लक्ष्मीपूजनासाठी देव्हाऱ्यासमोर ठेवलेले सोन्याचे दागिने आणि रोकड असल्याचे ते पूर्णतः विसरून गेले. याच ऐवजावर चोरट्यांनी

.../२

# आंबेत पुलाची दुरूस्ती, आणि नविन पुलाचे मंजुरीसाठी यशस्वी प्रयत्न करणार : खा.सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजधानीतील आंबेत गावाचे सुपुत्र, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत बॅ.ए.आर.अंतुले यांची प्रगल्भ विचारसर्ण आणि कल्पनेतून विविध प्रकारच्या विकास योजनां बरोबरच रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्याना जोडणारा आंबेत पुल बांधण्यात आला. हा पुल नुसता दोन जिल्ह्यांना जोडणारा महत्वाचा दुवा असतानाच लोकांची मने जोडण्याचे काम केले आहे. कालांतराने हे पुल नादुरुस्त झाला असल्याने त्याची दुरूस्ती करण्याचे काम आघाडी सरकारचे माध्यमातुन तत्कालिन पालकमंत्री आदिती तटकरे असताना करण्यात आले आणि हे पुल वाहतुकीस खुला करण्यात आला परंतु पुलाचे ९ नंबर पिलर नादुरूस्त झाले असल्याचे

.../२



# आगीचा भडका उडून वृद्धेचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

चूल पेटवताना आगीचा भडका उडाल्याने त्यात ६५ वर्षीय आजीबाई भाजून त्यांचा रुग्णालयात दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना तालुक्यातील शिवकर गावात घडली आहे .

शिवकर येथे राहण्याऱ्या निर्मला राजाराम पाटील (वय ६५) या नेहमी प्रमाणे सकाळच्या वेळेस चूल पेटवत असतांना लाकडावर रॉकेल ओतल्याने आगीचा भडका उडाल्याने त्यात त्या भाजल्याने त्यांना नजीकच्या रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले असता त्यात त्यांचा दुर्देवी मृत्यू झाला आहे.

# इंदापूर रेल्वे स्टेशनला प्लॅटफॉर्म नसल्यामुळे प्रवाशांचे हाल

**दै.रायगड नगरी । तळा**

कोकण रेल्वेचे इंदापूर स्टेशनला प्लॅटफॉर्म नसल्याने दिव्यांग बांधव व ज्येष्ठ नागरिक महिला यांना प्लॅटफॉर्म नसल्यामुळे रेल्वेमध्ये चढ उतार करण्यास मोठा त्रास सहन करावा लागत आहे. गाडीचा थांबण्याचा वेळ हा अल्प असल्यामुळे घाई गडबडीत उतरून अपघात होण्याची शक्यतानाकारता येत नाही. तसेच तळ कोकणात गावात जाण्याचे गाड्यांची संख्या वाढली आहे व मुंबई ठाणेमहानगरात नौकरी निमित्ताने किंवा इतर कामानिमित्ताने शाळा, कॉलेज विद्यार्थी प्रवाशांची देखील संख्या वाढली आहे.

परराज्यातून मोठ्या प्रमाणात रेल्वे या गोव्यापर्यंत, बेंगलोर अगर पुढे जात असतात त्यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये गाड्या येत आहेत एस टी चे दर हे सर्वसाधारण सामान्यांना परवडणारी नसणारे कोकण रेल्वे कडे मोठ्या प्रमाणात प्रवाशांचा कल दिसून येत आहे त्यामुळे या रेल्वे स्टेशनला प्लॅटफॉर्म असणं अत्यंत गरजेचे आहे सदर गंभीर समस्या लक्षात घेऊन कोकण रेल्वे प्रशासनाने रेल्वे स्टेशनला प्लॅटफॉर्म करावेत व प्रवाशांना बसण्याची सोय देखील करावी. सद्यस्थितीमध्ये रेल्वे प्रवाशी रुळावर हे बसून आधार घेत आहेत जेणेकरून आपल्याला ताबडतोब एका बाजूने चढता येईल हे आज बसलेले निर्दशनात आले आहे त्यामुळे कोकण रेल्वे प्रशासनाने हे गंभीर समस्येची दखल घ्यावी जेणे करून त्या प्रवासात असणारे दिव्यांग बांधव, जेष्ठ नागरिक महिला, गरोदर महिला यांना व्यवस्थित चढ उतार करता येईल अशी मागणी सहकार्य कल्याणकारी दिव्यांग संघटना तळा तालुका यांनी केली आहे.



# दुर्गम दिवाळीचा बोध

सरकारने नेटाने प्रयत्न केले तरी राज्याच्या टोकावरील जनतेच्या मनात अनेकदा सल जाणवतेच. सण-समारंभांमध्ये हे हळवेपण थोडे अधिक असते. त्यातून तुलनेचे विचार घोंगावतात. सुविधांचा रतीब पेलणारी शहरे आणि गैरसोयींचा शेजार स्वीकारणारी खेडी असे चित्र आपसुकच पुढे केले जाते. सरकारी योजनांच्या अंमलबजावणीत विकासाच्या विकेंद्रीकरणाची काळजी अभिप्रेत असते. काही भाग मात्र निसटतो. मग तक्रारींचा खच पडतो. राज्याच्या टोकावरील गडचिरोलीची अवस्था तशीच आहे. मागील चाळीस वर्षांत हजारो कोटींचा निधी जिरविल्यानंतरही रस्ते, पुलांसारख्या पायाभूत सुविधांचा अभाव तिथे फक्त जाणवत नाही, तर प्रत्यक्षात दिसतो. कोरची ते पातागुडमपर्यंत तब्बल सहाशे किलोमीटरपर्यंतचा हा विस्तीर्ण जिल्हा आहे. दाट जंगलामुळे माओवाद्यांचा ससेमिरा असतो. वन्यप्राण्यांची दहशतही नेहमीचीच. सरकारी योजनांमध्ये अडसर आणणारी मानवी श्वापदेसुद्धा तेवढीच भयंकर असल्याची बोच बरेचदा आदिवासींच्या ओठी येते. हा त्रागा समजून घेण्याखेरीज व्यवस्थेजवळ पर्याय नसतो. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माओवाद्यांच्या गुहेत जाऊन दिवाळी साजरी करण्याला निश्चितच महत्त्व आहे. पिचलेल्या, नागविलेल्या गेलेल्या घटकांना यातून सराकात्मक संदेश देण्याचे काम झाले. उपेक्षितांच्या अंतरंगात डोकावणारा नायक तसाही लोकांना आवडतो. एरवी मुंबई ते मंत्रालय अशाच व्यस्त दिनक्रमात अडकले असताना कधीतरी मुलचेराच्या व्यथाही यंत्रणेने ऐकाव्यात ही सीमेवरील नागरिकांची अपेक्षा असते. अलीकडील भेटींच्या सातत्याचे परिणाम लगेच दिसतील असे समजण्यात अर्थ नाही. गडचिरोली हा अनेक बाबतीत माघारलेला प्रदेश आहे. योजनांचा महापूर आणला तरी तेथील तहान संपणार नाही. विकासासाठी कासावीस झालेल्या जिवांना विश्वासात घेण्यात नाही म्हटले तरी तिथे दुर्लक्ष झाले. ती कोरड शांत करण्याची प्रक्रिया झपाट्याने राबवावी लागेल. आरोग्याच्या दृष्टीने तो हळहळता प्रांत आहे. रिक्तपदांच्या जादा अनुशेषामुळे त्या भागात आरोग्यसुविधांची वानवा आहे. माओवाद्यांच्या गोळीएवढीच मलेरिया, मेंदूज्वराची दहशत तिथे जाणवते ती त्यातूनच. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यापूर्वी गडचिरोलीचे पालकमंत्रिपद सांभाळले आहे. ही जबाबदारी पार पाडताना त्यांनी लॉकडाउनमध्येही सीमेवर जाऊन पोलिसांचे मनोबल वाढविले होते. त्यांना मिळणारे अन्न कोणत्या दर्जाचे आहे याची तपासणी केली होती. पालकमंत्रिपद गेल्यानंतरही गडचिरोलीची आठवण त्यांनी ठेवली हे विशेष. यंदा ते छत्तीसगड सीमेजवळील दुर्गम भागात गेले. धोडराज या अतिसंवेदनशील पोलिस ठाण्यापर्यंत त्यांचे पोहचणे विकासाच्या मार्गात खोडा घालणाऱ्यांना दिलेले चोख उत्तर आहे. आदिवासी आणि जवानांसोबत त्यांनी दिवाळी फराळ केला. काही गोष्टी औपचारिक असल्या तरी त्यामागे खोल अर्थ दडला असतो. पोलिसांचा आत्मविश्वास या कृतीतून वाढला असेल. आदिवासी बांधवांमध्ये आलेले परकेपण दूर सारून आपलेपण निर्माण करण्यासाठी हा पुढाकार फायदेशीर ठरतो. केवळ भावनांनी काम चालेल असाही याचा अर्थ नाही. निसर्ग संपदेची लयलुट असतानाही करंटेपण माथी लिहिल्या गेलेल्या या जिल्हाची करुण कथा बदलण्यासाठी अव्याहत प्रयत्नांची गरज आहे. गोदावरी, इंद्रावती, प्राणहिता, पामुलगौतम, पर्लकोटा, कठाणी, वैनगंगा यासारख्या बारमाही नद्यांच्या पाण्यातून सिंचनाच्या कायमस्वरूपी सोयी अस्तित्वात यायला हव्यात. वनकायद्यामुळे रखडलेल्या मोठ्या आणि मध्यम सिंचन प्रकल्पांची गाडी मार्गी लागायला हवी. सिंचनापासून वंचित असलेल्या तीन लाख हेक्टर जमिनीला सुगीचे दिवस लाभतील तेव्हा ओरड थांबेल. मुख्यमंत्र्यांनी समृद्धी महामार्गाचा नवा मुहूर्त नोव्हेंबरमध्ये असल्याचे सूतोवाच केले आहे. गडचिरोलीपर्यंत हा मार्ग नेण्याचा सरकारचा मनोदय आहे. तसे झाल्यास विकासाचा वेग निश्चित वाढेल. वनोपजांवर जगणाऱ्या आदिवासींनाही भक्कम मदत व्हायला हवी. लोहखनिज, ग्रॅनाइटचे साठे आहेत, मात्र उद्योगांअभावी तेथील विकास खोळंबला आहे. 'सुरजागड'चा विश्वास सर्वदूर पसरायला हवा. जिल्ह्यात खनिकर्म विभागाला मोठे काम मिळणार असल्याची सुवार्ता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवाळीतच दिली. या घोषणेनुसार स्टीलचा कारखाना येत असल्यास त्याचे स्वागत व्हायला हवे. पन्नास हजार लोकांना रोजगार मिळाला तर गडचिरोलीचे भेसूर चित्र बदलण्यास मदत मिळेल. गडचिरोलीत शुद्ध आणि विपुल खनिज संपदा आहे. तिथे खनिकर्माला विरोध आहे. वैयक्तिक हितसंबंधातून हे दुखणे उभे केल्याचा सरकारी यंत्रणेचा आरोप आहे. पोलिस आणि प्रशासनाने लोकांना विश्वासात घेतल्यास हा तिढा सुटू शकेल. येत्या काळात विकासाचा महामार्ग सीमेपर्यंत नेतानाच संवादात खंड पडणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. पंतप्रधान कारगिलमध्ये जातात आणि मुख्यमंत्री गडचिरोलीत, हे दिवाळीचे चित्र स्वयंस्पष्ट आहे. हा जिव्हाळा खेड्यापाड्यांत नेला तर गोळीबारांच्या प्रदेशात आत्मीयता वृद्धिंगत होईल. मुख्यमंत्र्यांचा गडचिरोली दौऱ्याकडे सुसंवादाचे महाद्वार म्हणून बघायला हवे. यंत्रणेने तोच धागा पकडून तसे वागायलाही हवे.

# राष्ट्रवादीला रामराम ठोकत लताताई मुंढे शिवसेनेत स्वगृही परतल्या



**दै.रायगड नगरी । तळा**

राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्या लताताई मुंढे पूर्वाश्रमीच्या शिवसेनेच्या महिला तालुका अध्यक्ष यांनी मागच्या निवडणुकीच्या वेळेला राष्ट्रवादी प्रवेश केला होता त्यानंतर महीला जिल्हा सरचिटणीस पदांची जबाबदारी सांभाळली होती. गेल्या काही महिन्या पासून अंतर्गत कुरघोडीमुळे नाराज होत्या. रक्तात सोशल वर्क करण्याची दांडगी इच्छा असल्याने सामाजिक, राजकीय क्षेत्रात झोकून देण्याची तयारी असते. जनतेची सेवा करुन राजकारण स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी दिलेली शिकवण आज देखील उराशी बाळगून करीत असून भविष्याचा विचार करता आज मात्र पुन्हा दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर उद्धव बाबासाहेब ठाकरे शिवसेनेत पुन्हा प्रवेश केला आहे.


यावेळी दक्षिण जिल्हा प्रमुख अनिल नवगणे तालुका प्रमुख नाना दळवी यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश करून शिवसेना शाल घालून स्वागत केले. यावेळी अनिल नवगणे म्हणाले कि लताताई मुंढे यांच्या पुनः प्रवेशाने आमची काम करण्याची ताकद वाढली आहे. शिवसैनिक हा खरा शिवसैनिकचअसतो. हे सिध्द होत आहे त्यांच्याकडे काम करण्याची इच्छा शक्ती दांडगी असल्याने स्वगृही परतले आहेत. त्याचे स्वागत आहे असे मत व्यक्त केले. त्याच्यावर तालुका महीला प्रमुखपदांची जबाबदारी दिली असून निश्चितच महिला संघटन मजबूत होईल असा विश्वास व्यक्त केला. यावेळी उपतालुका प्रमुख प्रमुख संतोष आमले, भगवान शिंदे विभाग प्रमुख धोंडू ठसाळ विजय कदम नितीन साळवी दिलीप महाडीक पांडुरंग दुर्गुले सुरेश कदम कानू पिंगळे उपस्थित होते.


# माणगांवच्या सर्वात उंच कुंभे परिसरात टिपले खंडग्रास सुर्यग्रहण

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव तालुक्यातील जवळपास आठशे मिटर उंचीवरील कुंभे बोगद्या जवळ जाऊन, छायाचित्रकार शंतनु कुवेसकर व त्याचा मित्र शुभंकर वनारसे यांनी आजचे खंडग्रास सुर्यग्रहण सायंकाळी ०५.०० ते ०६.०० वाजताच्या दरम्यान सहज खास चित्रीत केले. यासाठी त्यांनी सुरुवातीला प्रखर सुर्याचे चित्रण आपल्या कॅमेरा लेन्सला एक्स-रे फिल्म लावुनच हे ग्रहण टिपले. साधारणतहा ०५ .४० ते पुढे ०६ .०० वाजता अस्ताला जाणाऱ्या लालतांबड्या सुर्याचा ग्रासलेला मोठा खंड विना फिल्टर देखिल उघड्या डोळ्यांनीही स्पष्ट दिसत होता.

यावेळी सुर्याचा जास्तीत जास्त ग्रासलेल खंड दिसत असतानाच येथे पूर्ण सुर्यास्त झाला, असे निरिक्षण त्यांनी नोंदविले आहे. पूर्वी लहानपणी सुर्यग्रहण पहाण्यासाठी मोठी उत्सुकता असे त्यावेळी एक्सरे फिल्म, वेल्डिंग ग्लास, आणि दिव्याच्या काजळीवर संपूर्ण काळी केलेली काच वापरुन हे ग्रहण पाहिले जायचे सुर्याकडे उघड्या डोळ्यानी पाहणे धोक्याचे असते, अस मोठी माणस सांगायची. साध्या गॉगल ग्लास मधुनही ते पाहु नये, आज तालुक्यातील अनेकांनी हे ग्रहण पाहीले असुन सोशल मिडियावर तसेच स्टेट्सवर ग्रहणाची छायाचित्र झळकताना दिसत होती.





# वृद्ध पर्यटकांना आवड माथेरान पर्यटनस्थळाची



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान हे असे एकमेव सुंदर पर्यटनस्थळ आहे की याठिकाणी एकदा आलेली व्यक्ती वारंवार पर्यटनासाठी हमखास येणार अशीच काहीशी या छोट्याशा गा-वाची ख्याती आहे त्यामुळेच इकडे येण्याचा मोह ऐन वृद्धापकाळात सुध्दा होत असल्याचे इथे पर्यटनाला येणारी वयोवृद्ध मंडळी आवर्जून सांगत असतात.

अन्य पर्यटनस्थळ ठिकाणी मोटार वाहनांची वर्दळ असते त्यामुळे प्रदूषण आणि कर्कश आवाज येत असतो त्यावेळी अनेकदा आपण शहरात असल्याचा भास होतो. परंतु माथेरान त्याला अपवाद आहे कारण याठिकाणी घोडा आणि मानवचलीत हातरीक्षा हीच सध्यातरी प्रमुख वाहने पर्यटकांच्या सेवेसाठी उपलब्ध आहेत. केवळ माथेरानशी नाळ जुळलेली असल्यामुळे वर्षोनुवर्षे पर्यटकांना हे ठिकाण नेहमीच मोहित करते त्यामुळेच त्यांची पाऊले आपसूकच इकडे वळतात.

जवळपास तीस वर्षांपूर्वी आम्ही याठिकाणी आमच्या लहान लहान मुलांना सोबत घेऊन आलो होतो.वृद्धापकाळाने आम्हाला चालणे जमत नाही. व्हीलचेअर वर बसून आम्हाला आमची मुले इकडे फिरावयास घेऊन येतात ते केवळ आम्ही त्याच्याजवळ हट्ट धरतो की चला माथेरानला. काही दिवसांपूर्वी इथे ई रिक्षा सुरू झाली आहे असे समजले होते म्हणून आमच्या मुलांनी आम्हाला इकडे आणले परंतु अद्यापही ई रिक्षा सुरू झाली नाही त्यामुळे आजही आम्हाला नाईलाजाने व्हीलचेअर वर बसून यावे लागते आणि महत्वाच्या ठिकाणी हातरीक्षा मधून प्रवास करावा लागत आहे. इथे पर्यावरणीय दृष्टीने ई रिक्षा सारखा सुंदर प्रकल्प मार्गी लागणार आहे हे खूपच कौतुकास्पद आहे. यामुळे इथे आमच्या सारखी जेष्ठ मंडळी मोठया प्रमाणावर नक्कीच भेट द्यायला येतील यात शंकाच नाही. लवकरच इथे ही वाहतुकीची व्यवस्था निर्माण व्हावी यासाठी आम्ही आग्रही आहोत.

**पल्लवी बडगुजर, जेष्ठ पर्यटक मुंबई**

# रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल तर्फे रोटरी घनदाट जंगल प्रकल्प

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मानवाला प्राणवायू ची किती गरज असते आणि त्याचे महत्त्व किती आहे हे सर्वांना माहीत आहेच .करोना च्या काळात तर हे प्रकर्षाने जाणवले आणि या प्राणवायू साठी आवश्यक आहेत वृक्ष आणि घनदाट जंगले. याचाच विचार करून रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल ने एक उपक्रम हाती घेतला आहे .

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल तर्फे निर्माण करण्यात येणाऱ्या पनवेल शहरामधील नियोजित रोटरी घनदाट जंगल प्रकल्पाचे उदघाटन सर्वसामान्य पनवेलकरांच्या शुभहस्ते केलेल्या वृक्षारोपणाने करण्यात येणार आहे . तरी आपण स्वतः एका वृक्षाचे रोपण करण्यासाठी रविवार दिनांक ६ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत आपल्या सोयीनुसार नियोजित रोटरी घनदाट जंगल प्रकल्पाचे जागी आवश्य यावे . असे आवाहन रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल ने केले आहे. सदर रोटरी घनदाट जंगल प्रकल्प भूखंड (नियोजित ), लक्ष्मी आय चॅरिटेबल हॉस्पिटल शेजारी , उरण रोड , पनवेल येथे असून रविवार ,६ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी ९ ते १२ पर्यंत आपण आपल्या नावाने किंवा आपल्या आप्त स्वकीयांच्या नावाने स्मृती प्रित्यर्थ मोठ्या वृक्षाचे रोपटे लावू शकता . या रोपट्याला आपल्या नावाची पाटी वृक्षारोपणाच्या वेळी लावली जाईल .सदरहू वृक्षारोपणासाठी रुपये २०००/- ( रु .दोन हजार) असे नाममात्र देणगी मूल्य एका रोपट्यासाठी आहे .आपण दिनांक २ नोव्हेंबर पर्यंत देणगी मूल्य भरून आपले रोपटे व नाव आरक्षित करण्यासाठी आणि नावाची पाटी तयार करण्यासाठी मो . नं . ९८२०२५८५१५ किंवा ९३२२२९७५२२ वर एस . एम. एस किंवा व्हाटसअप अथवा फोन करून संपर्क करू शकता .आम्हाला खात्री आहे की आपण या रोटरी घनदाट जंगल उपक्रमात आपल्या नावाच्या वृक्षाचे रोपटे लावून आवश्य सहभागी व्हाल आणि पनवेलकरांचे नियोजित घनदाट जंगलाचे असलेले स्वप्न पूर्ण करण्यास हातभार लावा .असे आवाहन अध्यक्ष रो.लक्ष्मण पाटील,सचिव रो.अनिल ठकेकर,रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल यांनी करून अधिक माहिती संपर्कासाठी ९८२०२५८५१५,९३२२२९७५२२ येथे साधावा .

पृष्ठ क्र.१ वरुन...

## अनिल देशमुख पुन्हा हायकोर्टात

जामीन मिळण्याबाबत जशा दोन कठोर अटी आहेत, तशा अटी सीबीआयने ज्या कायद्यांतर्गत भ्रष्टाचाराच्या आरोपांबद्दल गुन्हा दाखल केला आहे, त्या भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यात नाहीत.

तसेच ईडीने नोंदवलेल्या गुन्ह्याच्या प्रकरणात दोन्ही कठोर अटींची पूर्तता झाल्यानेच हायकोर्टाने ४ ऑक्टोबरला मला जामीन मंजूर केला. सीबीआयने भ्रष्टाचाराच्या आरोपांवरून दाखल केलेल्या मूळ एफआयआरच्या आधारे ईडीने गुन्हा नोंदवला आहे. त्यामुळे सीबीआयच्या प्रकरणात जामीन मिळण्यासाठी मी अर्ज केला. जो या कथित गुन्ह्यात मुख्य आरोपी आहे आणि इतरही अत्यंत गंभीर गुन्ह्यांच्या प्रकरणांत आरोपी आहे, त्या सचिन वाझे यालाच सीबीआयने माफीचा साक्षीदार बनवले आहे. यावरूनच माझ्याविरोधात गुन्हा नोंदवण्याचा देशातील महत्त्वाची तपास संस्था असलेल्या सीबीआयचा कुहेतू लक्षात येतो. ईडी व सीबीआयने नोंदवलेल्या दोन्ही गुन्ह्यांत आरोपीला कमाल शिक्षा ही सात वर्षांची होऊ शकते. मी आताच जवळपास एक वर्षाचा कारावास भोगला आहे. सीबीआयचा तर तपासही अद्याप पूर्ण झालेला नाही. त्यामुळे खटला सुरू होणे तर दूरची गोष्ट आहे. त्याशिवाय माझे वय ७३ वर्षे असून अनेक आजारांनी ग्रस्त आहे. तेवढ्या कारणांवरूनही खरे तर मी जामिनासाठी पात्र ठरतो.

हायकोर्टाने तशाच प्रकारचे आरोप व कथित आर्थिक व्यवहारांबाबत गुन्हा नोंद असलेल्या पीएमएलए प्रकरणात सर्व कायदेशीर मुद्द्यांचा विचार करून आणि दोन कठोर अटींची कसोटी लावून जामीन मंजूर केला असताना; तशी कोणतीही अट भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यात नसूनही सीबीआय कोर्टाने जामीन नाकारणे म्हणजे माझ्यावर मोठा अन्याय आहे. कारण त्यामुळे मी तुरुंगातून बाहेर येऊ शकत नाही. ही न्यायाचीच मोठी शोकांतिका आहे', असे म्हणणे देशमुख यांनी -वीं.अनिकेत निकम यांच्यामार्फत केलेल्या जामीन अर्जात मांडले आहे.

## पनवेलमधून ८ लाखाच्या दागिन्यांची चोरी

घरात शिरुन डल्ला मारला आणि पोबारा केला. या घटनेनंतर पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांनी २ पथके स्थापन करुन चोरट्यांचा शोध सुरु केला आहे.

## आंबेत पुलाची दुरूस्ती, आणि नविन पुलाचे मंजुरीसाठी यशस्वी प्रयत्न करणार : खा.सुनील तटकरे

पुन्हा एकदा निदर्शनास आले असल्याने त्याचे दुरूस्तीसाठी आणि आंबेत पुलाला पर्यायी नवीन पुलाची निर्मिती करण्यासाठी माझे यशस्वी प्रयत्न करणार असल्याचे मानोगत रायगड जिल्हा खासदार सुनिल तटकरे यांनी मौजे आंबेत येथे छत्रपती शिवाजी महाराज चौक सुशोभीकरण, आंबेतकोंड, संदेरी ग्राम पंचायत पाणी पुरवठा योजनेचे भूमीपुजन, बस स्थानक उद्धाटन, गडदावगाव अंतर्गत रस्ता भूमिपूजन कर्यक्रमात व्यक्त केले.

या वेळी त्यांचे समावेत पक्षाचे नेते भास्कर ऊर्फ दाजी विचारे, जिल्हा चिटणीस महादेव पाटील, तालुका अध्यक्ष समीर बनकर, महेश शिर्के, अंकुश खडस, जी.प.माजी सभापती बबन मनवे, प.स.माजी सभापती उज्वला सावंत, जयंत चीबडे, महीला अध्यक्षा सोनल घोले, सरपंच अफरोजा डावरे, मुजफ्फर मुकादम, सरपंच फारुख हजवाने, नाना सावंत, सतिश शिगवण, महेश घोले, संतोष (नाना) सावंत आदी मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयोजीत कार्यक्रमांत खासदार तटकरे यांनी आधिकपणे सांगताना रयतेचे राज्य करणारे राजे छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जातींधर्माच्याच्या लोकांना आणि बारा बलुतेदाराना सोबत घेत तात्कालीन वेळी कुलाबा ही राजधानी निर्माण केली होती. नंतरच्या कालावधीत राज्याचे नेतृत्व करण्याची संधी बॅ.अंतुले साहेबांना मिळाली आणि त्यांनी कुलाब्याचे नाव रायगड जिल्हा असे केले. त्यांचे गावातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे चौकाचे सुशोभीकरण करण्यासाठी अधिकचा निधी उपलब्ध करु असे आश्वासन देताना येथील आश्वारुढ पुतळा पाहण्यासाठी पुणे, मुंबई, रत्नागिरी, मंदणगड, दापोली, खेड व अन्य परिसरातून असंख्य पर्यटक आणि शिवभक्त येवुन महाराजांचे चरणी नतमस्तक होतात याची दखल घेतानाच कोणी काही म्हणो नादुरूस्त आंबेत पुलावरील वाहतूक बंद पडली असल्या कारणाने माझे प्रयत्नाने मेरीटाईमबोर्ड मार्फत सर्वांना मोफत प्रवासासाठी जंगलजेटी उपलब्ध करून देण्यात आली आहे, ही मोफत प्रवासी सेवा संपुर्ण महाराष्ट्रातुन फक्त आणि फक्त आंबेत येथे उपलब्ध करून देण्यात आली असल्याची माहिती खासदार तटकरे यांनी आवर्जुन करून दिली. पुलाचे दुरूस्ती करण्याचे कामाला निधीची उपलब्धता करून देण्यात आली आहे मात्र तांत्रिक अडचणी येत असल्याचे सांगितले. पुल दुरूस्ती आणि नवीन पर्यायी पुल बांधकाम मंजुरी करून घेण्यासाठी नव्या सरकारकडे आपले प्रयत्न असतील असे आवर्जुन उल्लेख केला. खाडी विभागात मंजुर करण्यात आलेल्या जळजीवन मिशन योजने अंतर्गत सर्व नळ पाणीपुरवठा योजना या आघाडी सरकारचे कालावधीत माजी पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली मंजुर करण्यात आलेल्या आहेत. मंजुर योजनेसह गाववाडीत अन्य विकास कामे लवकरात लवकर आणि दर्जेदार बांधकाम करुन पुर्ण करण्यात यावीत अशी सुचना उपस्थित कार्यकर्त्यांना केली.

# रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या नोंदीत सुरक्षा रक्षकांना दिवाळी सणा पुर्वी बोनस वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या नोंदीत सुरक्षा रक्षकांना सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरीता रजेचा पगार ४ टक्के व सणाची सुट्टी १ टक्का ही रक्कम मे २०२२ महिन्यामध्ये वाटप केलेली आहे. तसेच सानुग्रह अनुदान ८.३३ टक्के रक्कम दिवाळी सणापुर्वी मंडळाच्या नोंदीत सुरक्षा रक्षकांना वाटप केली असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष तथा सहाय्यक कामगार आयुक्त समीर शि. चव्हाण यांनी दिली.

तसेच मंडळाचे सचिव तथा सरकारी कामगार अधिकारी स्नेहल सु. माटे यांनी असे नमुद केले की, सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षामध्ये कार्यरत १ हजार ६३० सुरक्षा रक्षकांना रजेचा पगार ४ टक्के व सणाची सुट्टी १ टक्का नुसार १ कोटी २५ लाख ५८ हजार ५८६ ही रक्कम मंडळाने उक्त नमुद सुरक्षा रक्षकांना मे महिन्यामध्ये वाटप केलेली आहे. तसेच सानुग्रह अनुदान ८.३३ टक्के प्रमाणे २ कोटी ८ लाख २० हजार ३१९ रूपये दिवाळी सणापुर्वी वाटप केली आहे. मंडळाने मे २०२२ महिन्यामध्ये वाटप केलेली सणाची सुट्टी व रजेचा पगार रक्कम रुपये सुरक्षा पर्यवेक्षकास ८ हजार ६५८ व सुरक्षा रक्षकास रुपये ८ हजार ७३ तसेच दिवाळी सणापूर्वी सानुग्रह अनुदान रक्कम रुपये सुरक्षा पर्यवेक्षकास १४ हजार ४२५ व सुरक्षा रक्षकास रुपये १३ हजार ४५० अशी एकुण रक्कम रुपये सुरक्षा पर्यवेक्षकास २३ हजार ८३ व सुरक्षा रक्षकास रुपये २१ हजार ५२४ वाटप केलेली आहे.

रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांना पगार व इतर कल्याणकारी सुविधांचा लाभ देत आहे. तरी रायगड जिल्ह्यातील सुरक्षा रक्षकांनी व त्यांना ठेकेदार एजन्सीमार्फत नोकरीस ठेवणाऱ्या मालकांनी मंडळामध्ये नोंदीत होऊन त्यांच्याकडील सुरक्षा रक्षकांनाही मंडळाचे फायदे मिळवून द्यावेत असे आवाहन अध्यक्ष समीर शि. चव्हाण यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

**नर्सिंग कोर्स प्रवेश**

**जी.एन.एम. / ए.एन.एम.**

**सन २०२२ -२३ वर्षाकरीता प्रवेश उपलब्ध**

**-: शैक्षणिक पात्रता :-**

**बारावी उत्तीर्ण (आर्ट्स/ कॉमर्स/ सायन्स)**

**पत्ता: लाईफ लाईन स्कूल ऑफ नर्सिंग एस.टी. स्टँडसमोर, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, लाईन आळी, पनवेल**

**संपर्क : ९३७२७१६१६० / ९९४७७२०७७७**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## व्ही.के. हायस्कुल प्रांगणात भव्य रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रंगदीप क्रिएशन तर्फे व्ही.के. हायस्कुल प्रांगणात भव्य रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन दि. २६ ऑक्टोबर २०२२ ते दि.६ नोव्हेंम्बर २०२२ पर्यंत करण्यात आले आहे. या भव्य रांगोळी प्रदर्शनाचे उदघाटन पनवेल पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी करून कलाकारांचे कौतुक केले. ४५ वर्षाची परंपरा जपत पनवेलच्या कलाकारांनी आकर्षक रांगोळ्या काढल्या आहेत. कलाकारांना प्रोत्साहन म्हणून आपणही आवर्जून या रांगोळी प्रदर्शनाला अवश्य भेट द्यावी.असे आवाहन प्रितम म्हात्रे यानी केले आहे. या उदघाटन प्रसंगी सहकारी मंगेश भोईर, रोहित मोरे आणि इतर सहकारी उपस्थित होते.



## जिल्ह्यात ३१ ऑक्टोबर रोजी पालकमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत संपन्न होणार जनता दरबार

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याचे उद्योग मंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.श्री.उदय सामंत यांच्या सूचनेनुसार सोमवार, दि.३१ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी ११:३० वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड येथे जनता दरबार आयोजित करण्यात येणार आहे.

जनता दरबारमध्ये प्राप्त झालेल्या अर्जांची नोंद घेवून त्यावर प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल पालकमंत्र्यांना सादर केला जाणार आहे. प्रत्येक महिन्याला अशा प्रकारे या जनता दरबारचे आयोजन नियमितपणे केले जाणार आहे. तरी नागरिकांनी सोमवार, दि.३१ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी ११:३० वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड येथे होणाऱ्या जनता दरबाराकरिता जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पालकमंत्री श्री.सामंत यांनी केले आहे.

# पारगान-धनगरवाडी परिसरात पहाटेच्या वेळेत चोरुन आणलेल्या गुरांची खुलेआम कत्तल?

## ग्रामस्थांच्या वतीने पोलीसांत तक्रार ; अज्ञातां विरोधात मुरुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील विविध भागात चोरून आणलेल्या गुरांची कत्तल करण्याच्या घटनेत वाढ होत असल्याचे दिसून येत असून नुकतेच काल पहाटेच्या वेळेत तालुक्यातील पारगान–धनगरवाडी परीसरात चोरुन आणलेल्या गुरांची खुलेआम कत्तल केली असल्याचा प्रकार समोर आला असून या बाबत ग्रामस्थांच्यावतीने मुरुड पोलीसात तक्रार दाखल करण्यात आली असून सदर प्रकरणी पोलिसांनी अज्ञा–तां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मुरुड तालुक्यातील ब–याचशा भागात गुरांचे मालक आपल्या गुरांना दिवसरात्र मोकाट सोडत असल्याने वाहतूकीस अडथळा निर्माण होऊन अपघात घडत आहेत.याकडे संबंधित ग्रामपंचायत व नगरपालिका जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत.यासाठी ग्रामपंचायत व नगरपालिका यांनी कोंडवाडे तयार करून या प्रकारांना आळा घालण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



याबाबत सविस्तर हकिकत शिघ्रे–पारगान येथील एक ग्रामस्थ हे दिवाळीची सुट्टी असल्या कारणाने पारगण येथे आले होते.काल दि.२५ ऑक्टोबर रोजी पहाटे कामानिमित्त मुंबई येथे मोटार सायकलने सकाळी ५.२४ वा. पारगान येथील घरातुन निघालो. पारगान ते गारंबी कडील रस्त्याकडे जाणा–या मातीच्या या रस्त्याने ते मोटर सायकलने जात असताना मोठी डाग नावाने ओळखल्या जाणा–या भागात आल्यावर चढण चढत असताना त्यांनी एक चार चाकी गाडी मोठी डाग येथील रस्त्यावर पूर्वभिमुख उभी असुन तिच्या समोरील हेडलाईट चालु ठेवुन तेथे कोणीतरी अज्ञात दोन ते तीन इसम काहीतरी करीत होते. माझ्या गाडीचा आवाज ऐकून त्यातील एक अज्ञात इसमाने त्यांच्या चेह–यावर बॅटरीने प्रकाश टाकल्याने डोळे दिपले व पुढील काहीच दिसत नव्हते. त्यानंतर तेथे हजर असलेले दोन ते तीन अज्ञात इन हिंदी भाषेत चलो जल्दी काम पूरा करो कोई तो यहा आया तो भाग जाते है असे बोलू ला–गले. ती वेळ सकाळी ५.४० वा.ची होती. तेथे दोन ते तीन लोकांची आवाज देत असल्याने ते घाबरून गेलो व पुन्हा माझ्या गावाच्या दिशेने मागे फिरून निघुन गेलो. त्यानंतर सदरची संपूर्ण घटना ग्रामस्थांना सांगितली. त्यानंतर गावातील सर्व ग्रामस्थ असे मोठी डाग येथे सकाळी ५.५५ वा. आले . त्यावेळी तेथे रक्ताचे दोन सडे, पोटातील चा–याचे दोन चोथे, एक सुरा, चप्पल जोड, एक काळा कपडा व काळ्या व सफेद रंगाचे दोन छोटे तुकडे त्या ठिकाणी पडलेले पाहिले, कोणते तरी चार चाकी वाहनामधून आलेले कोणीतरी अज्ञात दोन ते तीन इसमांनी आपसात संगनमत करून लबाडीच्या उद्देशाने अज्ञात जनावरे चोरून त्या जनावराचे मासांचे विक्री करण्याच्या उद्देशाने ने अज्ञात जनावराची कत्तल करून मास घेवून गेले असल्याची खबर देण्यात आली आहे.

याबाबत मुरुड पोलीस ठाण्यात गुन्हा उी छे. १३७/२०२२ भा.द.वि.स कलम ३७९,४२९,३४ सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण (सुधारणा) अधिनियम २०१५चे कलम ५ (ब), ५ (क), ९.९ (अ) प्रमाणे.दाखल करण्यात आला असून वरीष्ठ पोलिस अधिकारी तसेच पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलिस उपनिरीक्षक खुतिजा शेख पुढील तपास करीत आहेत.

दरम्यान,तालुक्यातील विविध भागात गुरे चोरून त्याची कत्तल करण्याच्या घटनेत वाढ होत असल्याचे दिसून येत असून शेतकऱ्यांची पाळीव जनावरे चोरुन नेऊन कत्तल करण्याच्या घटनेत वाढ होत असल्याने तालुक्यातील शेतकरी व दुग्ध पालन व्यवसाय करणारे घाबरले आहेत.


रायगड जिल्ह्याच्या काही भागातही गुरे चोरीच्या घटना समोर आल्या आहेत. नांदगाव पांगाळे येथे तीन गुरांची कत्तल, मोरे येथे एका बैलाची कत्तल, बारशीव येथे दोन बैल पळवून नेले होते परंतु सदरचे आरोपी रोहा येथे पकडल्याने त्या शेतकऱ्यांना ते बैल परत मिळाले.नुकत्याच काशीद पुलाखाली गुरांचे कातडे अवयव आढळून आल्याची घटना ताजी असतानाच पारगान–धनगरवाडी येथे पहाटेच्या वेळेत आढळून आलेल्या प्रकाराने भितीचे वातावरण असून मुरुड पोलिसांनी याकडे गांभीर्याने पाहून घडणाऱ्या घटनेवर नियंत्रण मिळवावे गुरे चोरून नेणाऱ्यांचा शोध लावावा व कत्तल होऊ नये. यासाठी योग्यती कारवाई ची मागणी केली जात आहे.

## ठाकरे गटाच्या शिवसेना मध्यवर्ती कार्यालयाचे तळा शहरात उद्घाटन

**दै.रायगड नगरी । तळा**

ठाकरे गटाच्या शिवसेना मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन जिल्हाप्रमुख अनिल नवगणे यांच्या हस्तेकरण्यात आले. आज हिंदूधर्मातील दिवाळी पाडवा भाऊबीज या सणाच्या निमित्ताच्या शुभ मुहूर्तावर कार्यालयाची भेट दिली आहे.

यावेळी अनिल नवगणे म्हणाले की उध्दव बाळासाहेब ठाकरे शिव–सेना मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले असून शहराच्या मुख्य ठिकाणी असून तालुक्यातील विविध समस्या, गोरगरीब जनतेची कामं केली जातील असा विश्वास व्यक्त केला. यावेळी तालुका प्रमुख नानादळवी संपर्कप्रमुख हरिश्चंद्र म्हातले महिला तालुका अध्यक्ष लता मुंढे युवा सेनाधिकारी नितीन साळवी, उपतालुका प्रमुख भगवान शिंदे, संतोष आमले, भगवान तांबे, तर विभाग प्रमुख धोंडू ठसाळ, विजय कदम सह नथुराम घाग दिलिप महाडीक सुरेश कदम जनार्दन मुंढे, रघुनाथ पागार कार्यकर्ते शिवसैनिक उपस्थित होते.




## नेरळ ग्रामपंचायत येथे दिव्यांगांना साहित्याचे वाटप

**दै.रायगड नगरी । माथेरान**

दि.२४ रोजी नेरळ ग्रामपंचायत कार्यालयातील सभागृहात नेरळ पंचक्रोशितील जवळ जवळ शंभर दिव्यांग बांधवांसाठी उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते दिवाळी निमित्त साहित्य वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाची प्रस्तावना रायगडभूषण नारायण सोनवणे यांनी केले. अंध, अपंग विकास संस्था वारेचे अध्यक्ष अरुण जोशी यांनी आपल्या मार्गदर्शनात गेले बारा वर्षे अपंगाना जिवोनोपयोगी साहित्य मोफत वाटप करीत असल्याचा उल्लेख केला. शासकीय योजनांची त्यांनी कल्पना दिली. नारायण सोनवणे आणि अरुण जोशी यांच्या संकल्पनेतून दिनांक १६ ऑक्टोबर रोजी माण–गाव येथे दिव्यांगासाठी बचत गटाची स्थापना केली. याबद्दल कार्यक्रमात मान्यवरांनी अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रथमेश मोरे व प्रमुख पाहुणे नेरळ ग्रामपंचायतचे सदस्य संतोष शिंगाडे, सौ हिंदोळा माजी उपसभापती कर्जत तालुका, मनोहर जोशी, सुनील राजे, गंगू सुभ्यया, कैलास देशमुख, रवि कराले, अरकम मेमन आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात मान्यवरांनी दिव्यांग बांधवांसाठी मार्गदर्शन करून दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.



## वंचित बहुजन आघाडीतर्फे राज्य सरकारचा जाहिर निषेध

**दै.रायगड नगरी । कर्जत**

ऐन दिवाळीत जाहिर केलेले साहित्य गोरगरीबांना न मिळणे हि चक्क सरकारने गोरगरीबांची केलेली चेष्टा आहे. यासंदर्भात वंचित बहुजन आघाडीतर्फे राज्य सरकारचा केला जाहिर निषेध करण्यात आला.

राज्यातील सामान्य जनतेची दिवाळी गोड करण्याकरीता सरकारने १०० रुपयांत चार वस्तु देण्याचा निर्णय घेतला होता. सरकारची घोषणा कागदावरच राहिली आहे, कारण दिवाळी गोड करण्यासाठी गेलेले नागरिक रिकाम्या हाती परतले आहेत.

सरकारने सर्वसामान्य जनतेची दिव–ाळी गोड व्हावी याकरिता स्वस्त धान्य दुकानात १०० रुपयांत चार वस्तु देण्याचा निर्णय घेतला होता. त्यात एक लिटर तेल, एक किलो रवा, साखर आणि चणाडाळ देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, या निर्णयाची अद्यापही अंमलबजावणी सुरू झालेली दिसत नाही. स्वस्त धान्य दुकानात गोरगरीब सामान्य नागरिक जाऊन सरकारने घोषणा केलेल्या वस्तु आल्यात का? असे विचारत आहे. त्यात अद्यापही या वस्तु न आल्याचे कळताच नागरिक नाराजी व्यक्त करत असून रिकाम्या हाती घराकडे परतत आहे. स्वस्त धान्य दुकानदारांनाही याबबात कुठलीही कल्पना नसल्याने दिवाळी गोड करण्याबाबत आलेल्या निर्णयाची कुठलीही स्पष्टता होत नाहीये. त्यामुळे सरकारने सामान्य नागरिकांसाठी घेतलेला निर्णय कागदावरच असल्याची चर्चा सुरू झाली आहे. वंचित बहुजन आघाडीतर्फे तहसीलदार यांना निवेदन दि.२१ऑक्टोबर २०२२. रोजी देण्यात आले होते. निवेदनामार्फत सरकारने जाहिर केलेले दिवाळीचे साहित्य लवकरात लवकर देणेत यावे ही मागणी केली होती. परंतु दिवाळीचा महत्वाचे ४ दिवस संपले तरी सरकारने जाहिर केलेले साहित्य न मिळाल्यामुळे आज दि.२७ ऑक्टोबर रोजी येथील लोकमान्य बाळ गंगाधर टिळक चौकात गरिबांची चेष्टा करणाऱ्या राज्य सरकारचा वंचित बहुजन आघाडीच्यावतीने जाहिर निषेध करण्यात आला.याप्रसंगी वंचित बहुजन आघाडी कर्जत तालुका अध्यक्ष धर्मेंद्र मोरे, जिल्हा उपाध्यक्ष हरिश्चंद्र यादव, जिल्हा सचिव अनिल गवळे, जिल्हा संघटक सुनील गायकवाड, शहर अध्यक्ष लोकेश यादव, शैलेश खोब्रागडे, सचिव प्रदीप गायकवाड, तालुका उपाध्यक्ष निलेश पवार, विकी जाधव, शरद गायकवाड, कमलाकर जाधव, धनवी काका,आदि पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. त्यानंतर कर्जत तहसिलदार यांची पुन्हा भेट घेऊन त्यांना लवकरात लवकर दिवाळी रेशनिंग वाटप करणेची मागणी केली यावेळी आंदोलनाचा इशारा देण्यात आला.




## श्रीक्षेत्र रामवाडी येथील शेडचे उद्घाटन व लोकार्पण सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील रामवाडी–पाच्छापूर येथे लोकनेते व रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष श्री सुरेशशेठ खैरे यांचे आदेशानुसार ग्रुप ग्रामपंचायत पाच्छापूरचे सरपंच संजयशेठ हुले यांच्या मार्गदर्शनाखाली रामवाडी ग्रामस्थ मंडळाने मागणी केल्याप्रमाणे येथील श्रीराम मंदिराशेजारील मोकळ्या जा–गेत मंडळाच्या सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या शेडचे बांधकाम करण्यात आले होते. रामवाडी ग्रामस्थांनी केलेल्या मागणीला प्रतिसाद देत सरपंच व सर्व सदस्यांनी त्यास मंजुरी दिला. सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत या शेडचे लोकार्पण करण्यात आले.

यावेळी पाली नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष आरिफभाई मणियार, श्रीराम सेवा मंडळाचे सल्लागार प्राचार्य बळीराम निंबाळकर सर, रामवाडी ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष मोरेश्वर हळदे व इतर पदाधिकारी, ग्रामस्थ महिला मंडळ यांच्यासह सदस्य किसन मोरे, पाच्छापूर येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत नलावडे, अनंता जोरे, शंकर डिघे, मंडळाचे सल्लागार किसन वारंगे व सर्व कार्रकर्ते व पदाधिकारी या समारंभासाठी आवर्जून उपस्थित होते.

सर्व ग्रामस्थांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत सत्कार करून दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. सर्वांप्रती समाधान व कृतज्ञता व्यक्त करुन श्रीराम सेवा मंडळाचे अध्यक्ष राजु पातेरे यांनी आभार व्यक्त केले.


### PUBLIC NOTICE

BE IT KNOWN TO THE GENERAL PUBLIC that Late MALTI ANANT SAKPAL who died on 12/07/2020 at Navi Mumbai, was 50% owner of immoveable property bearing Flat No.104, area admeasuring 304 sq.fts carpet on 1st floor, in wing 'A', Bldg No.9, Sector-8, Mahalaxmi Nagar, constructed on land bearing Survey No and Hissa Nos.1/0 Plot No.1/0, 1/0 Plot No.2/0, 2/0, 3/0, 9/1B, 9/2, 16, 17/1, 18, 19 at Nere Village in Panvel Taluka, Dist - Raigad, leaving behind her husband SHRI. ANANT S. SAKPAL, son SHRI. DATTATRAY ANANT SAKPAL and daughters MRS.PRIYA MADAN MORE and MRS. SANGEETA PRAVIN KATHURIYA.

SHRI. ANANT S. SAKPAL, SHRI. DATTATRAY ANANT SAKPAL, MRS.PRIYA MADAN MORE and MRS. SANGEETA PRAVIN KATHURIYA being a legal heirs of Late MALTI ANANT SAKPAL has made an Application to the MAHALAXMI NAGAR (RATRANI) CO-OP. HSG. SOCIETY LTD to transfer the said Flat in their name under the provisions of Bylaws.

Any person having any claim, right or interest in the aforesaid property or any part thereof they may put their such claim, right or interest within 7 days from the date of publication hereof.

If no claim is made in respect of the said property, within a period stated above, the transfer procedure complete and no claim will be entertained after the expiry of 7 days period.

Sd/-
**KUSUM KIRAN GHARAT**
Advocate & Notary
PL6A/6/0:2, Gr. Floor,
Near MSEB Office,
Sector – 1, Khanda Colony,
New Panvel (W), Navi Mumbai 410 206.
Ph. No. 9967335046
adv.kusumgharat@gmail.com

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : चाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली शेतजमीन मिळकत या मिळकतीसमोर लिहिलेल्या कब्जेदारांकडून आमचे अशिल हे सदरची मिळकत कायम खरेदी घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : चाळ, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदारांचे नाव | गट क्रं. उपविभाग क्र. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार |
|---|---|---|---|
| श्री.बाळकृष्ण बुधाजी धोंगडे | १०३/३८ | ०–०५–१० पो.ख. ०–००–२० ०–०५–३० | १.५६ |

सदर मिळकत निर्वेध असल्याची वर नमूद विद्यमान मालकांनी दिली आहे. तरी वरील मिळकती बाबतीत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीस, दावा वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क–हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रर, न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२७/१०/२०२२

सही/–
**ॲड.अनिल सु. जाधव**
वकील उच्च न्यायालय
शॉप नं.०३, अनंत पाटील चाळ,
रोडपाली, ता.पनवेल, जि.रायगड
मो.नं.९८२१०६२०११

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड येथील महसूल दप्तरी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी या जमिनीचे सध्याचे मालक श्री.दिपक एस. जोशी रा. मुंबई, श्री.सुरेश अनंत पाटील रा.खोपटे, ता.उरण, जि.रायगड यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.प्रती | आकार |
|---|---|---|---|
| १२१ | २ | ०–२४–०० पो.ख. ०–००–५० एकूण ०–२४–५० | २.०० |

वरील वर्णनाची शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी रस्ता, पाणी येण्या–जाण्याचा रस्ता अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यासंबंधची व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी कागदपत्रांच्या स्वरुपात स्वतःहून हजर होवून आमचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत कळवावे. वरील मुदतीत कोणीही कसलीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही असे समजण्यात येईल किंवा असल्यास तो हक्क व हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून सदर मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यनंतर मागाहून कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास ती हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.२८/१०/२०२२
स्थळ : उरण

सही/–
**ॲड.योगेश नामदेव म्हात्रे**
रा.कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड
मो.नं.८०९७१०८०६०/९८१९९१०८०८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : कळंबुसरे, ता.उरण, जि.रायगड येथील महसूल दप्तरी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी या जमिनीचे मालक प्रेमा विष्णू राऊत, तृप्ती विष्णू राऊत, किर्ती विष्णू राऊत, दिप्ती विष्णू राऊत, धरती विष्णू राऊत, स्वाती अरुण म्हात्रे, राजेंद्र यशवंत राऊत, वैभव यशवंत राऊत, मधुकर एकनाथ राऊत, अनंत एकनाथ राऊत, बारकूबाई भास्कर राऊत, वसंत भास्कर राऊत, नलिनी यशवंत राऊत, बेबीबाई मारुती राऊत, आशा मारुती राऊत, निरंजन मारुती राऊत, किरण मारुती राऊत, जगदीश पांडुरंग राऊत, आशा सुनील राऊत, मिनाक्षी लालचंद वाघमारे, मंजुला पांडुरंग राऊत, प्रवीण सुनील राऊत, भारती पांडुरंग राऊत, कैलास सुनील राऊत सर्व रा.कळंबुसरे, ता.उरण, जि.रायगड यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कळंबुसरे, ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.प्रती | आकार |
|---|---|---|---|
| १३० | १ | ०–४५–१० पो.ख. ०–०५–६० एकूण ०–५०–७० पैकी कायम खरेदी खताचे क्षेत्र ०–१९–०० | ८.०७ |

वरील वर्णनाची शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी रस्ता, पाणी येण्या–जाण्याचा रस्ता अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यासंबंधची व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी कागदपत्रांच्या स्वरुपात स्वतःहून हजर होवून आमचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसाच्या आत कळवावे. वरील मुदतीत कोणीही कसलीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही असे समजण्यात येईल किंवा असल्यास तो हक्क व हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून सदर मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यनंतर मागाहून कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास ती हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.२८/१०/२०२२
स्थळ : उरण

सही/–
**ॲड.योगेश नामदेव म्हात्रे**
रा.कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड
मो.नं.८०९७१०८०६०/९८१९९१०८०८

# संक्षिप्त...

## पोलीस भरती पूर्वतयारी प्रशिक्षण शिबिर

**दै.रायगड नगरी । रोहा**

कुणबी समाजोन्नती संघ मुंबई ग्रामीण शाखा रोहा अंतर्गत चणेरा विभाग कुणबी ग्रुपच्या वतीने कुणबी समाज सभागृह चणेरा येथे रवि.दि.३० ऑक्टो.रोजी स.१० ते दु.१ या वेळेत पोलीस भरती पूर्वतयारी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

चणेरा कुणबी ग्रुपच्या वतीने नेहमीच समाजोपयोगी वैविध्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करून समाजात जनजागृती केली जात आहे.त्याच उपक्रमाचा एक भाग म्हणून सदरील प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यावेळी सेवानिवृत्त सहायक उपायुक्त गुन्हा अन्वेशन विभाग प्रा.पोलीस प्रशिक्षण केंद्र खंडाळा रोहिदास दुसार, सेवानिवृत्त पो.निरिक्षक खांबेरे दिनेश बिरगावले,कार्यरत पोलीस निरीक्षक मुंबई नितीन गिजे आदी पोलीस खात्यातील तज्ञांकडून सखोल मार्गदर्शन मिळणार असून जास्तीत तरूणांनी या सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन ग्रुपच्या वतीने करण्यात आले आहे.

## अजगर जातीचा सुमारे दहा फूट लांबीचा मोठ्या सापाला जीवदान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर सेक्टर ३५ येथील तळोजा रोड येथे रस्त्याच्या मधोमध एक मोठा साप थांबल्याची माहिती नागरिकांनी पुनर्वसु फाउंडेशन संस्थेला दिली. सर्पमित्र शारोन सोनावणे आणि त्यांचे सहकारी विशाल असूळकर, हर्ष गायकवाड, सुदेश गायकवाड त्वरित घटना स्थळी पोहचले. सापाची पाहणी केल्यावर भारतीय अजगर जातीचा सुमारे दहा फूट लांबीचा मोठा साप असल्याचे लक्षात आले. सर्पमित्र शारोन यांनी बचाव कार्य सुरू केले. नेटवर्क शारोन आणि सुदेश यांनी अजगराला सुखरूपरित्या ताब्यात घेतले. तसेच वनविभागास कळवून सुरक्षितरित्या जंगलात सोडले.


### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# आनंदशिधा अतिआनंदी जाहिरात खर्च टाळला असता तर आणखी गरीबांना लाभ झाला असता

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

दिवाळीच्या तोंडावर सर्वसामान्य गरिबांना दिलासा मिळावा यासाठी मोठा गाजावाजा करत शिंदे सरकारने आनंदाचा शिधा वितरण सुरू केले. पण आता हा आनंदाचा शिधा हा ऑफलाईन पद्धतीने वितरण करण्यात येणार. महाराष्ट्रातील प्राधान्य कुटूंब व अंत्योदयअन्न योजनेतील पात्र सुमारे १ कोटी ६२ लाख शिधावाटप पत्रिका लाभार्थीमधील सुमारे ७ कोटी नागरिकांना दिवाळीनिमित्त वाटप करणार आहेत.

येणाऱ्या आनंदाचा शिधा संचाचे वितरण ऑफलाईन पद्धतीने करण्यात येणार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या निर्णयामुळे १ किलो साखर, १ किलो रवा, १ किलो चणाडाळ व १ लिटर पामतेल या चार वस्तू लवकर मिळू शकतील अशी माहिती राज्याचे अन्न, नागरी व पुरवठा मंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिली असल्याचे



वृत्त होते. पण ऐन दिवाळीत आनंदाच्या शिधावाटपाला ग्रहण लागले कि काय? असा सवाल लाभार्त्यांकडुन विचारला जातोय. वितरण व्यवस्थेतील अधिकारीही बुचकाळ्यात पडले असुन रेशन दुकानदारां पर्यंत साखर, तेल, रवा या तिनच वस्तु पोहचल्या असल्याची माहीती रेशन व्यवस्थेकडुन दिली गेली.

आता कमित कमी शिरा करुन तरी खायला मिळेल हे ही नसे इतुके. या अतिआनंदी वितरणाचा एवढा गाजावाजा आणि फलकबाजी पाहिली तर आता शासन नेमके यावर एवढा खर्च का करत आहे ? याच खर्चात आणखी अनेक लाभार्त्यांची जिवनावश्यक गरज भागवता आली असती, हे सुज्ञांस सांगणे न लागो ! खरतर हा खर्च शासनाच्या तिजोरीतुन होणार कि खाजगी खर्चातुन हे अतिआनंदाचे काम केले जाणार असा सवाल जनतेमधुन विचारला जात आहे. याची जोरदार चर्चा सर्वत्र ऐकावयास मिळत आहे.

दिवाळी आता अंतिम चरणात असुन उशिरा का होईना, याचा लाभ जास्त जनतेला मिळावा यासाठी सकारात्मक इच्छाशक्तीची गरज आहे. दिवाळी, महागाई अनियंत्रीत बाजारभाव यामुळे सर्वसामान्यांचे सांगेनासे हाल आहेत, मुग गिळुन लोक संयमाने हे सारे आनंदाचे क्षण सहन करीत आहेत.

# केदार भगत मित्र परिवार कडून दीपोत्सव २०२२ छत्रपती शिवाजी चौक येथे उत्सवात साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

यावेळी दिव्याची सज्ञावट करण्यात आली. छान रांगोळी काढण्यात आली होती व तसेच फटाके च्या आतिषबाजी नि पूर्ण आकाश रंगीबेरंगी झाले होतें व नादस्फूर्ती ढोल ताशा पथकाने आपल्या वादनाने महाराजांना मानवंदना देण्यात आली. ह्यावेळी प्रचंड अशी पनवेल करांचाही गर्दी झाली होती ह्यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केदार भगत व केदार भगत मित्र परीवार चे विशेष कौतुक केले. व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

ह्यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, मा.सभागृह नेते परेश ठाकूर, मा.नगरसेवक राजू सोनी, मा.नगरसेवक अजय बहिरा, मा.नगरसेवक मुकिंद काझी, मा.नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, मयुरेश नेटकेर, रोहित जगताप, नीता माळी, सुहासिनी केकाणे, अंजली इनामदार, चंद्रकांत मंजुळे, पवन सोनी, जवाद काझी, निकिता पाटील, संगिता पोतदार, गीतांजली भगत, अंकिता बहिरा, अनिता गायकर, प्रियांका पाटील, सुजाता भगत, श्रेया जाचक, योगिता डांगरे, प्राण्या भगत, प्रीती दसवंते, संध्या भगत, सुमित दसवंते, संकेत दसवंते, नितेश भगत, शेषनाथ गायकर, मयूर पाटील, हर्षद गडगे, भावेश शिंदे, संतोष वर्तले, ब्रिजेश बहिरा, श्रीकांत शिंदे, कपिल कुरघोडे, अभिजित साखरे, साहिल मोरे, जयदीप भगत, मंदार भगत मंगेश भगत, सिद्धेश भगत, चैतन्य भगत, हर्ष भगत, रमाकांत भगत, प्रमोद भगत, सचिन भगत, जयेश भगत, फिरोझ शेख, नसीम खान, स्वप्नील सोनटक्के, आनंद गायकवाड, अजित सिंग, अमित दसवंते, यज्ञेश पाटील, अथर्व पाटील आदी मान्यवर व केदार भगत मित्र परिवार उपस्थित होते.



# देवकुंड धबधब्यात आणखी एका पर्यटकाचा बळी

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगांव तालुक्यातील भिरा पाटणूस भागात पर्यटकांसाठी देवकुंड धबधबा हा प्रसिद्ध आहे. या धबधब्यात अनेक पर्यटकांचे बळी गेले आहेत.१४४ कलम लागू असताना सुद्धा येथील ग्रामस्थ तरुणाचे पर्यटकांना फेस बुक, इस्टाग्रामवरून ऑनलाईन मार्गदर्शक करून हे काही ग्रामस्थ तरूण पैशासाठी काम करीत आहेत.

अशाच प्रकारे माणगांव पोलीस सूत्राकडून मिळाल्या माहितीनुसार देवकुंड धबधब्यावर फिरण्याकरिता जात असताना जंगल भागात एका लाकडी ब्रिज जवळ अचानक एका पर्यटकाला फिट येऊन चक्कर आल्याने तो जमिनीवर बेशुद्ध अवस्थेत पडल्याने. त्यांला पुढील उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय माणगांव येथे दाखल केले असता तेथेल डॉक्टरांनी तपासून या पर्यटक व्यक्तीला मयत घोषित केले.

सदर मयत व्यक्तीचे नाव हे जनार्दन गोपीचंद वाघमारे वय ४६ वर्ष रा. कळंबोशी, ता. सुधागड जि.रायगड येथील असून या घटनेची खबर देणारे सूर्यकांत शिवराम गायकवाड वय ५६ रा. भैयरीचीवाडी, पाटणूस ता. माणगांव जि.रायगड यांनी दिली. यावेळी घटनास्थळी माणगांव पोलीस ठाणे येथील महिला पोलीस सब इन्स्पेक्टर पाटील मॅडम यांनी भेट दिली.माणगांव पोलीस ठाण्यात ५३/२०२२ सी. आर. पी. सी. कलम १७४ नुसार नोंद करण्यात आली सदरची घटना मंगलवार दि. २५ ऑक्टोबर २०२२ रोजी घडली आहे.पुढील तपास माणगांव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पो. हवालदार तोरवे करीत आहेत.

देवकुंड येथील ही घटना घडण्याच्या दोन दिवस अगोदर माणगांव मधील पत्रकार यांनी या ठिकाणी अनुचित प्रकार घडतील अशी बातमी २० ऑक्टोबरला प्रसिद्ध केली होती. परंतु भिरा,पाटणूस येथील काही तरूण ग्रामस्थ तसेच माणगांव पोलीस यांनी या बातम्याची दखलच घेतली नाही जर का या बातमीची दखल वरिष्ठ अधिकारी यांनी घेतली असती व देवकुंड धबधब्यावर पर्यटकांना जाण्यासाठी मनाई केली असती तर या पर्यटकाचा बळी गेला नसता.

# माथेरान नगरपालिका निवडणुकीचा सारीपाट नगराध्यक्ष आरक्षणावर अवलंबून

## मुख्य पक्षांच्या आघाड्या अनिश्चित ; कार्यकर्ते संभ्रमात

**दै.रायगड नगरी । माथेरान**

राज्यातील बहुतांश नगरपालिका निवडणुका डिसेंबर अथवा जानेवारी महिन्यात होण्याच्या मार्गावर असल्या तरीसुद्धा माथेरान मध्ये केवळ नगराध्यक्ष पदाचे आरक्षण बाकी राहिले असल्यामुळे इथले मुख्य पक्ष समजले जाणारे काँग्रेस, शिवसेनेचा शिंदे गट आणि भारतीय जनता पक्षाने अद्यापही आघाडी करण्याबाबत आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही.तर शिव- सेनेचा ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने काही महिन्यांपूर्वी शिवराष्ट्र पॅनल बनवून आगामी निवडणुकीसाठी तयारी दर्शवली आहे. माथेरानच्या राजकारणात मुख्य पद हे नगराध्यक्ष असल्याने याच पदांवर सर्वांची भिस्त अवलंबून



असते. सर्वकाही देवाणघेवाण असो किंवा निविदेच्या कामातून जी काही प्राप्ती होते ते या पदावर अधोरेखित असते.त्यामुळेच येथील प्रमुख पक्ष समजले जाणारे काँग्रेस, शिवसेनेचा शिंदे गट आणि भारतीय जनता पक्षाने अद्यापही आघाडी करण्याबाबत आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही.शिवराष्ट्र पॅनेलला शह देण्यासाठी या तीनही पक्षांची आघाडी झाली नाही आणि केवळ नगराध्यक्ष पद आपल्या पारड्यात पडणार नसेल तर कदाचित वेगवेगळ्या पद्धतीने नाईलाजाने स्वबळावर या तीनही पक्षांना निवडणुकीचा सामना करावा लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यातूनच मतांची विभागणी होऊन शिवराष्ट्र पॅनेलला काहीअंशी याचा लाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नुकताच पतसंस्थेच्या निवडणुकीत शिवराष्ट्र पॅनेलला यश संपादन करता आले आहे. पतसंस्थेच्या निवडणुकीत जरी बहुतांश मतदार हे शिवराष्ट्र पॅनेलचे होते तरीसुद्धा काँग्रेस, शिवसेनेचा शिंदे गट आणि भारतीय जनता पक्षाने पिसारनाथ पॅनेलची आघाडी बनवून त्यांना काहीशा मतांच्या फरकाने पराभवाला सामोरे जावे लागले होते.त्यामुळेच येत्या नगरपालिका निवडणुकीमध्ये पिसारनाथ पॅनेलची आघाडी झाल्यास अगदी सहजपणे शिवराष्ट्र पॅनेलवर मात करू शकतात. परंतु या तीनही पक्षातील नगराध्यक्ष पदासाठी इच्छुक असणाऱ्या मंडळींनी सुध्दा आपली कामाची सचोटी आणि आपण स्वतः या छोट्याशा गावासाठी आगामी काळात काय काय व्हिजन देऊ शकतो. पर्यटनाच्या दृष्टीने आपण राज्य सरकार केंद्र सरकारच्या माध्यमातून भरीव निधी उपलब्ध करू शकतो की नाही याचाही सारासार विचार करून नगराध्यक्ष पदासाठी आग्रही असावे असे सुज्ञ मंडळींमधुन बोलले जात आहे. अन्यथा जर हा नगराध्यक्ष पदाचा तिढा सुटत नसेल तर तीनही पक्षाच्या वरिष्ठांना कुणाच्या पाठीमागे किती राजकीय ताकद आहे याची शहानिशा करण्यासाठी गुप्तपणे माहिती घेऊन जो नगराध्यक्ष पदासाठी कार्यक्षम उमेदवार आहे त्याला पाठिंबा देत आघाडी करणे आवश्यक बनले आहे.अन्यथा ऐन निवडणुकीच्या तोंडावर आपसातच या महत्वपूर्ण पदासाठी रस्सीखेच सुरू होऊन आपल्याला हे पद मिळत नाही म्हणून विरोधी पक्षांच्या उमेदवारांना निवडून देण्यासाठी क्रॉस वोटिंग सुध्दा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

माथेरान हे अगदी कमी मतदार संख्या असणारे छोटेसे गाव आहे आणि इथे केवळ सत्ता उपभोगता यावी यासाठी इथली काही राजकीय मंडळी खूपच खालच्या थरावर जाऊन राजकारण करताना दर पाच वर्षांनी दिसतात. अशा मंडळींना गावाच्या विकासा बाबतीत काहीएक स्वारस्य नसते. गावाचा विकास होवो अथवा गाव लयाला जावो आपण सत्तेत असावे आणि सर्व फायदे कशाप्रकारे लाटता येतील याकडे लक्ष वेधलेले असते त्यासाठी सुज्ञ मतदारांनी सुध्दा निवडणूक काळात विकासात्मक दृष्टीने भविष्याचा वेध घेऊन उमेदवारांकडून सर्वकाही लाभ घेऊन मतदानाचा हक्क बजावला पाहिजे तरच हे गाव खऱ्या अर्थाने विकसनशील बनू शकेल. कारण पतसंस्थेच्या निवडणुकीत जरी शिवराष्ट्र पॅनल ने विजय मिळवला असला तरी पतसंस्था व नगरपालिकेच्या निवडणूक भिन्न स्वरूपाच्या आहेत अश्वपालकांनी जरी एक गठ्ठा मते शिवराष्ट्र पॅनलला दिलेली असली तरी पिसारनाथ पॅनेलच्या शिंदे गट, भाजप व काँग्रेसच्या पॅनलने ४०० मते मिळवली आहेत. हाच ट्रेंड पुढे चालेल असे सांगत येत नाही कारण अश्वपालकांमध्ये अस्वस्थता वाढू लागली आहे मतदान हा प्रत्येकाचा अधिकार आहे त्यावर दडपशाही यापुढे चालणार नाही असा पवित्रा काही अश्वपालक घेत आहेत.

# मशालींच्या प्रकाशात उजळले अवचितगडाचे बुरूज ..

## शिवशंभु प्रतिष्ठानच्या मावळ्यांनी साजरे केले प्रकाशोत्सव!

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा तालुक्यातील अवचितगडावर दिपावळी पहाटचा कार्यक्रम साजरा करण्यात आला, यावेळी मशालींच्या प्रकाशात अवचितगडाचे बुरूज उजळून निघाले, शिवशंभु प्रतिष्ठानच्या मावळ्यांनी अथक परिश्रम करीत गडावर दीपावलीचे औचित्य साधून प्रकाशोत्सव साजरे केले. मोठ्या प्रमाणात तरुण वर्ग आणि शिवभक्त यामोहिमेत सहभागी झाले होते.

गडकोट संवर्धनात अग्रेसर असलेल्या रोहा शहरातील शिवशंभु प्रतिष्ठान या संस्थेच्या मार्फत अवचितगडावर दिपावळी पहाटच्या कार्यक्रमाचे जय्यत तयारी करण्यात आली, त्यासाठी गडाची काही दिवसांपूर्वी साफसफाई स्वच्छता करण्यात आली, गेल्या सात वर्षांच्या परंपरेला अनुसरून आणि शिवकाळाचा वारसा जपत शिवशंभु प्रतिष्ठान मार्फत अवचितगडावर दिप- ावली पहाटचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमाची आतुरता तालुक्यातील तसेच जिल्ह्यातील प्रत्येक शिवप्रेमींना असल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष विशाल तेलंगे यांनी दिली. दिपावली पहाटच्या पूर्वसंध्येला अवचित गडाचे बुरुज मशालींच्या सानिध्यात उजळून निघाले होते, तर गोंधळ, जागरण तथा शिवकालीन आखाड्याच्या साथीने अवचित गडावर शिवकाळ अवतरलेला यावेळी दिसून आला. यासर्व शिवसाधनेने शिवभक्त अक्षरशः भारावून गेले होते, यामध्ये सहभागी झालेल्या प्रतिष्ठानच्या मावळ्यांची गडकोटांविषयीची निष्ठा दिसून आली. भल्या पहाटे ५ वाजता पहिला दिवा गडकोटांच्या चरणी या भवनेने अवचितगडावरील शंभु महादेवांच्या मंदिरात दिप प्रज्वलित केले गेले आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. गडकोटाच्या या शिवसोहळ्यास मोठया संख्येने शिवभक्त उपस्थित राहिले होते.



# विठ्ठल नामाच्या गजरात खांब ते पंढरपूर पायी दिंडी रवाना



**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील खांब विभागातून खांब येथून अखंड विठ्ठल नामाचे व ज्ञानोबा-तुकारामाचे गजरात तीर्थक्षेत्र पंढरपूरकडे पायी दिंडी रवाना झाली आहे.

सदर पायी दिंडी ३ नोव्हेंबर या कालावधीत तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे पोहोचणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे. स्वा.सु.गुरूवर्य अलिबागकर महाराज यांचे क्रुपाशिर्वादाने व वै.गुरूवर्य गोपाळबाबा वाजे व धोंडू बाबा कोलाटकर यांचे आशिर्वादाने तसेच दिंडीचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.श्री कृष्णा महाराज जाधव यांच्या नेतृत्वाखाली संपन्न होत असलेल्या या दिंडी सोहळ्यात दरवर्षाप्रमाणे याही वर्षी संपूर्ण रोहे तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील मोठ्या संख्येने भाविक भक्त सहभागी झाले आ- हेत.तर दिंडी सोहळ्याचे यशस्वीतेसाठी अध्यक्ष सदानंद जाधव, मारूती महाराज कोलाटकर, कृष्णाराम धनवी, प्रकाश थिटे, गणेश जाधव, एकनाथ मरवडे, ज्ञानेश्वर लोखंडे, राधिका लोखंडे, शुभांगी महाडिक, अजय पार्टे आदी प्रमुख पदाधिकारी यांच्यासह अन्य कार्यकारिणी सदस्य मेहनत घेत आहेत.

# ना नफा, ना तोटा तत्वावर जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या विक्री केंद्रात १५ टन मालाची विक्री

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते आणि जे एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे अध्यक्ष प्रीतम म्हात्रे यांच्या संकल्पनेतून साकारलेला ना नफा, ना तोटा तत्वावर जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या विक्री केंद्रात जवल- पास १५ टन मालाची विक्री करण्यात आली आहे . या उपक्रमाला नागरिकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. सदरचे विक्री केंद्र १८ ते २० ऑक्टोबर पर्यन्त पनवेल, नवीन पनवेल, खांदा कॉलनी, सेक्टर ९ उलवे येथे उभारण्यात आली होती.

महागाईच्या भस्मासुराने देशातील सर्वसामान्य जनतेला गिळंकृत केलं आहे. सर्वसामान्य माणसाची दिवाळी ही एक स्वप्नच बनून राहिली असल्यामुळे सर्वसामान्य माणूस विवंचनेत सापडला आहे. दररोज वाढणाऱ्या महागाईवर सामाजिक बांधिलकी बाळगणाऱ्या प्रीतम म्हात्रे यांनी सद- रची संकल्पना राबविली आहे . आणि त्यातून पनवेलकरांनी या संकल्पनेचे स्वागत केले. गतवर्षी देखील टनावरी माल ना नफा, ना तोटा या संकल्पनेवर पनवेलमधील नागरिकांपर्यंत पोहोचला होता. जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेने फराळासाठी आवश्यक रवा, साखर, मैदा या वस्तू जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी हा उपक्रम हाती घेतला आहे. सर्वसामान्य कुटुंबांना तर एकाच्या पगारावर घर चालवणे हीच गंभीर गंभीर बाब बनून राहिली आहे. त्यातच दिवाळी हा सण खिशाला कात्री लावून दिवाळे काढणारा असा आख्ययित असलेला सण असला, तरी दिवाळी साजरी करणे, लक्ष्मीचे घरामध्ये स्वागत करण्यासारखे तसेच विखुरलेल्या घरांना एकत्र आणणे यासाठी दिवाळीला खास महत्व असते. मात्र काही वर्षांमध्ये झालेल्या महागाईने सर्वच जनता त्रस्त झाली आहे. त्यामुळे ना नफा ना तोटा तत्वावर जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या मार्फत विक्री केंद्र उभारण्यात अली होती. त्याला नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला व १५ टन हुन मालाची विक्री करण्यात आली. दिवाळी सण असल्याने नागरिकांना थोडासा दिलासा म्हणून व दिवाळी हा सण आनंदाने साजरा करता यावा या उद्देशाने प्रितम म्हात्रे यांच्या संकल्पनेने दरवर्षीप्रमाणेच जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेने ना नफा ना तोटा तत्वावर विक्री करून नागरिकांना माफक दरात रवा, मैदा, साखर उपलब्ध करून दिली आहे. यामध्ये अर्धा किलो रवा, अर्धा किलो मैदा व एक किलो साखर असे १३६ रु. किमतीचे अर्धा किलो रवा, अर्धा किलो मैदा व एक किलो साखर माफक दर ९० रुपयामध्ये उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे पनवेलमधील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. या उपक्रमाबद्दल नागरिकांनी प्रीतम म्हात्रे यांचे आभार मानले आहेत.

